| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>**DIRECTORATE OF EDUCATION**<br>**(Secondary & Higher Secondary)**<br>**Maharashtra State**<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doehighersec@gmail.com


**परिपत्रक**

क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2021/2307
दिनांक-23/07/2021

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर

**विषय- इ.11वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.2021-22 कार्यवाही सुरु करणेबाबत.**

**संदर्भ-** 1.शासन निर्णय क्र. प्रवेश-2018/प्रक्र.333/एसडी-2 दि.23/06/2020 .
2.शासन पत्र क्र. प्रवेश-0621/प्रक्र.333/एसडी-2 दि.29/06/2021.
3.राज्यस्तर इ.11वी प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.17/07/2021.

सन.2021-22 मध्ये राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र(MMR) तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.11वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील प्रवेश प्रचलित पद्धतीनुसार कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन करण्यात येतील. तथापि इ.11वी चे सर्व प्रवेश सामाईक प्रवेश परीक्षा (CET) कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच केले जातील.

**मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** क्षेत्रांतील इ.11वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असल्याने या शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या इ.11वी प्रवेश प्रक्रियेची पूर्वतयारी सरु करणेत येत आहे. त्यासाठी https://11thadmission.org.in हे संकेतस्थळ असेल. सदर संकेतस्थळास भेट देऊन आपणास प्रवेश घ्यावयाच्या शहराचे नाव निवडावे व प्रवशासाठी आवश्यक पुढील कार्यवाही करावी.

**ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे असतील.**

| क्र | संबंधित घटक | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| 1 | **उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांसाठी** | **विद्यालय नोंदणी Jr College Registration**<br>(प्रवेश देण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांनी या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी लॉगीन आयडी व पासवर्ड सेट करुन विद्यालयाबाबतची माहिती ऑनलाईन भरुन भरलेली माहिती शिक्षण उपसंचालक यांचेकडून प्रमाणित करुन घेणे.) |
| 2 | **विद्यार्थ्यांसाठी** | **1)विद्यार्थी नोंदणी Student Registration.**<br>(विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करुन लॉगीन आयडी व पासवर्ड सेट करणे)<br>**2)प्रवेश अर्ज भाग-1 भरणे**<br>(भरलेला अर्ज आपली माध्यमिक शाळा किंवा मार्गदर्शन केंद्र यांचेकडून प्रमाणित करुन घेणे.)<br>**3)पसंतीक्रम देणे, भाग-2 (Option Form) भरणे**<br>(प्रवेश फेरीपूर्वी प्रवेशासाठी पसंतीची कनिष्ठ महाविद्यालये ऑनलाईन निवडणे) |

**प्रवेश प्रक्रियेची कार्यपद्धती -**

- विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश दोन प्रकारे घेता येतील.
  **1.केंद्रीय प्रवेश फेऱ्यांद्वारे Allotment मिळवून. (CAP Seats) किंवा**
  **2.कोटांतर्गत राखीव जागांवर संबंधित विद्यालयास संपर्क साधून.**
- प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भाग-1 भरुन प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. त्यानंतर (CAP Seats) करीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यास अर्जाचा भाग-2-पसंतीक्रम भरुन विद्यालये निवडता येतील. (किमान-1 व कमाल-10)

विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार प्रवेश फेरीमध्ये Allotment देण्यात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांनी संबंधित मिळालेल्या विद्यालयास संपर्क साधून आपला प्रवेश दिलेल्या वेळेत निश्चित करावयाचा आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांची विभागणी पुढीलप्रमाणे असेल.**

| | | बिगर अल्पसंख्याक | अल्पसंख्याक विद्यालये |
|---|---|---|---|
| 1 | **केंद्रिय प्रवेश फेरीद्वारे प्रवेश (CAP Seats)** | 85% | 35% |
| 2 | संस्थांतर्गत कोटा (InHouse Quota) | 10% | 10% |
| 3 | व्यवस्थापन कोटा (Management Quota) | 5% | 5% |
| 4 | अल्पसंख्याक कोटा (Minority Quota) | लागू नाही | 50% |

**अल्पसंख्याक कोटा** फक्त अल्पसंख्याक कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असेल आणि या जागांवर अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. **इनहाऊस कोटा** हा त्यांच संस्थेची माध्यमिक शाळा संबंधित विभागात असेल तर अशा माध्यमिक शाळांमधील इ.10वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लागू असेल. कोणत्याही कोटांतर्गत राखीव जागा दिलेल्या वेळेत संबंधित विद्यालयांना केंद्रीय/ CAP प्रवेशासाठी प्रत्यार्पित / Surrender करता येतील. कोटांतर्गत प्रवेश संबंधित कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन गुणवत्तेनुसार देण्यात येतील. विद्यालयामध्ये झालेले सर्व प्रवेश त्या-त्या वेळी संकेतस्थळावर नोंदविले जातील. प्रवेश फेऱ्या व प्रत्यक्ष प्रवेशाचे कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना यथावकाश देण्यात येतील.

अर्ज भरतांना, केवळ ज्या विद्यार्थ्यांना **मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** या शहारांमधील राज्यमंडळ संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असेल अशाच विद्यार्थ्यांनी या प्रणालीच्या मध्यमातून अर्ज करावा. राज्यातील उर्वरित ठिकाणच्या प्रवेशासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधावा. अशा सूचना विद्यार्थी व पालकांना द्याव्यात.

यासोबत सन.2021-22 मध्ये **मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** क्षेत्रांतील इ.11वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रकियेच्या सुरुवातीच्या टप्प्याचे वेळापत्रक सोबत संलग्न आहे. त्यानुसार प्रसिद्धी देऊन पुढील कार्यवाही आपलेस्तरावरुन सुरु करणेत यावी.

मार्गदर्शन केंद्र व माध्यमिक शाळांना विद्यार्थ्यांचे अर्ज प्रमाणित करणेबाबत आवश्यक सूचना देण्यात याव्यात. सर्व संबंधित घटकांसाठी आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

**पुणे,**
**दिनांक**-23/07/2021

(दिनकर टेमकर)
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

**विद्यार्थ्यांकरीता अर्ज भरण्याच्या सरावासाठी विशेष सुविधा-**

विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना अडचणींना सामोरे जावे लागू नये तसेच त्यांचा अर्ज भरण्याचा सराव करता यावा यासाठी **दिनांक.01 ऑगस्ट ते 07 ऑगस्ट,** 2021 या कालावधीत, संकेतस्थळावर **Dummy Login** सुविधा देण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्या सराव करावा. प्रत्यक्षात अर्ज भरण्यास सुरुवात होणेपूर्वी सदर माहिती नष्ट करुन **दि.09 ऑगस्ट 2021 पासून** संकेतस्थळावर प्रत्यक्षात अर्ज भरण्याची सुविधा त्यांना देण्यात येईल.